# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१११०
तारेचा पत्ता : 'युनिपुना'
फॅक्स : ०२०.२५६९३८९९

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ :— शै. प्रवेश/४४९२ दिनांक:— ५/८/२०११

प्रति,

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ७.
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.
३. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था.

**विषय : आर्थिक-दृष्टया मागासलेल्या वर्गातील गरीब, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य देण्याबाबत...**

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार उपरोक्त अर्थसहाय्य योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेची नियमावली व अर्जाचा नमूना पाठवित आहे.

कृपया परिपत्रकातील आशय संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा आणि संपूर्ण माहिती भरलेले अर्ज **दिनांक ३० सप्टेंबर, २०११ पर्यंत विद्यापीठाकडे पाठवावेत.** नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

५/८/११

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

# पुणे विद्यापीठ

**विषय : आर्थिक-दुर्बल घटकांतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य देण्याबाबत...**

आर्थिक- दृष्टया व सामाजिक दृष्टया मागासलेल्या वर्गातील गरीब व बुध्दीमान विद्यार्थ्यांना विद्यापीठाने सुधारित लागू केलेले शैक्षणिक शुल्क, आर्थिक दुर्बलतेमुळे भरता येत नसल्यास त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागेल. अशा परिस्थितीमध्ये पात्र, बुध्दीमान व गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली नाही तर, गुणवत्ता असतानाही आर्थिक दृष्टया मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणातील समान संधीना मुकावे लागेल. त्यासाठी आर्थिक न्यायाच्या बांधिलकीच्या दृष्टीकोनातून पुणे विद्यापीठाने आर्थिक दृष्टया व सामाजिक दृष्टया मागासवर्गातील गरीब, बुध्दीमान व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे म्हणून पुणे विद्यापीठ पातळीवर अर्थसहाय्य देण्याची योजना कार्यन्वित करण्याचे ठरलेले आहे.

अ) **<u>योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी आवश्यक पात्रता :</u>**

१. विद्यार्थी भारतीय नागरिक असावा आणि त्यानं नियमित विद्यार्थी म्हणून विद्यापीठाच्या अभ्यासक्रमास विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागामध्ये किंवा संलग्नित महाविद्यालयात किंवा मान्यताप्राप्त संस्थेमध्ये प्रवेश घतलेला असावा किंवा विद्यापीठाने संशोधन संस्था म्हणून मान्यता दिलेल्या संस्थेत संशोधन करणारा असावा.

२. **विद्यार्थी महाराष्ट्र शासन किंवा विद्यापीठाकडून किंवा इतर सार्वजनिक आर्थिक मदत करणाऱ्या संस्थेकडून शुल्कामध्ये सवलत घेणारा नसावा.**

३. विद्यार्थ्याच्या कुटुंबातील सर्व कमावत्या / मिळवत्या सदस्यांचे (आईवडील व इतर) वार्षिक उत्पन्न रू. १ लाख (रू. १,००,०००/—) पेक्षा जास्त नसावे.

४. या योजनेचे लाभ घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने अर्ज करताना मागील परीक्षेत कमीत कमी ६० टक्के गुण संपादीत केलेले असावेत. (६० टक्के पेक्षा कमी गुण असलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज करू नयेत.)

५. आर्थिक मदत ही विद्यार्थ्यांच्या मागील वर्षाच्या परीक्षेच्या वार्षिक गुणवत्तेवर आधारित राहील. विद्यार्थ्यांची हेजेरी ७५ टक्के व ६० टक्के गुण अनिवार्य राहतील.

६. महाविद्यालयांनी आर्थिकदृष्टया मागासवर्गातील गरजू आणि गुणवंत विद्यार्थ्यांची नावे कागदपत्रांच्या पूर्ततेसह **दिनांक ३० सप्टेंबर, २०११ पर्यंत विद्यापीठाकडे पाठवावित.**

७. **प्रत्येक महाविद्यालयामध्ये आर्थिक-दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सवलतीसाठी स्वतंत्र समिती असावी. त्या समितीने महाविद्यालय स्तरावर अर्जाची छाननी करावी व सोबत प्रमाणपत्र जोडावे. अपूर्ण व चुकीचे अर्ज विद्यापीठाकडे पाठवू नयेत.**

८. उत्पन्नाचा दाखला तहसिलदाराच्या सहीचा आवश्यक आहे.

९. विद्यार्थ्यांनी राष्ट्रीयकृत बॅकेत खाते उघडणे बंधनकारक असून बॅकेचे नाव व पत्ता, बॅक खाते क्रमांक, एम.आय.सी.आर. कोड, आणि आय.एफ.एस. कोड ची नोंद अर्जावर करावी.

(ब) **आर्थिक मदतीचे प्रकार :**

आर्थिक मदत ही पूर्ण शुल्क अथवा शुल्काच्या काही भागाची परिपूर्ती करेल अशा स्वरूपात असेल. आर्थिक मदत ही वार्षिक पध्दतीने असेल आर्थिक मदत घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. अर्जदारांच्या कुटुंबातील सदस्यांचे एकूण उत्पन्न (उत्पन्नाचा दाखला)
२. विद्यार्थ्यांची गुणवत्ता/ गुणानुक्रम (मार्कलिस्टची प्रत)
३. अर्जदाराच्या कुटुंबात अवलंबून असणाऱ्या व्यक्तींची संख्या
४. प्राचार्यांच्या सहीने २० रूपयांच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र
५. आईवडील किंवा पालक यांची सही

(क) समितीस पुरविलेली माहिती चुकीची आढळून आल्यास आर्थिक मदत काढून घेण्यात येईल. तसेच अर्जदार विद्यार्थी दोषी / अपराधी, गैरप्रकार (Unfair means) असे समितीने ठरविल्यास किंवा गैरशिस्त व नैतिकतेबाबत संबंधित समितीने शिक्षा केली असल्यास आर्थिक मदत पूर्णपणे काढून घेण्यात येईल.

(ड) अर्जदाराने अर्जासोबत त्याच्या संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे/ मान्यताप्राप्त संस्थांच्या संचालकांचे/विभागप्रमुख, विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग यांचे सहीनिशी वर्तणूक आणि प्रगतीचा दाखला/ अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

(इ) सोबत आर्थिक मदतीसाठी भरावयाचा नमूना अर्ज जोडलेला आहे.

सदरचे परिपत्रक विद्यापीठातील शैक्षणिक विभागाचे सर्व विभागप्रमुख, सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य आणि मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक यांनी सर्व संबंधितांच्या नजरेस आणून द्यावे व सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या नजरेस येईल अशा ठिकाणी सूचना फलकावर लावावे तसेच अर्जदारांकडून आलेले अर्ज अ (६) मधील सूचनेनुसार विद्यापीठाकडे ठराविक मुदतीत सादर करावेत.

(उ) प्रत्येक विद्यार्थ्याने लेखी स्वरूपात पुरविलेली माहिती सत्य आहे, अशा प्रकारचे हमीपत्र २० रूपयांच्या स्टॅम्पपेपरवर द्यावे.

(ऊ) संबंधित विद्यार्थ्याचे पूर्ण भरलेले फॉर्म **दिनांक ३० सप्टेंबर, २०११ पूर्वी** कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे. अपूर्ण व त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

(ए) **व्यवसायिक, अव्यवसायिक, पदव्युत्तर व पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या याद्या स्वतंत्रपणे असाव्यात व त्या दोन प्रतीत असाव्यात.**

गणेशखिंड , पुणे ७.
जा.क्र. : परिपत्रक/शै.प्रवेश/४४१२
दिनांक : 5/8/2011

कुलसचिवांकरिता 5/8/11

प्रति,

१. मा. विभागप्रमुख, सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये
३. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था

प्रत माहितीसाठी :

१. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सहाय्यक
२. मा. कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक
३. मा. वित्त व लेखा अधिकारी

# पुणे विद्यापीठ

## विद्यापीठ पातळीवर देण्यात येणारे आर्थिक सहाय्य

आर्थिक व सामाजिक दृष्टया गरीब व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना आर्थिक न्यायाच्या बांधिलकीच्या दृष्टीकोनातून शैक्षणिक वर्ष २००३ – ०४ पासून पुणे विद्यापीठ पातळीवर अर्थसहाय्य देण्याची योजना सुरू केलेली आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१० ते २०११ साठी आर्थिक मदत करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

## आर्थिक-दुर्बल घटकांतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत अर्ज.

अर्ज भरण्यासंबंधी सूचना :–

अ) अर्जामधील सर्व माहिती अचूक भरावी.

ब) सर्व कागदपत्रांची पूर्तता करावी.

क) अपूर्ण व मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्याचे नाव (आडनाव प्रथम लिहावे) | : श्री / श्रीमती / कुमारी ____________________ |
| २. | वडीलांचे / पालकांचे नाव | : ____________________ |
| ३. | सध्याचा पत्ता | : ____________________ |
| ४. | कायमचा पत्ता व फोन नं. | : ____________________ |
| ५. | धर्म / जात / पोटजात | : ____________________ |
| ६. | जन्मतारीख | : ____________________ |
| ७. | सध्या शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयाचे / विभागाचे नाव आणि अभ्यासक्रम | : ____________________ |
| ८. | मागील वर्षी उत्तीर्ण झालेली परिक्षा एकूण गुण व टक्केवारी | : ____________________ |
| ९. | मागील वर्षी मिळालेले एकूण गुण व टक्के | : ____________________ |
| १०. | वडिल / पालकांचा व्यवसाय | : ____________________ |
| ११. | एकूण उत्पन्न रू. | : ____________________ |
| १२. | कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न (दाखला जोडावा) | : ____________________ |
| १३. | इतर स्कॉलरशिप व आर्थिक मदत मिळत असल्यास कोणती असल्यास कोणती ? | : ____________________ |

१४. मागील वर्षात या योजनेचा लाभ घेतला होता काय ? : होय/नाही ______________________________

१५. बँकेचे नाव व पत्ता : ________________________________________

१६. राष्ट्रीयकृत बँक खाते क्रमांक : ________________________________________

१७. एम.आय.सी.आर. कोड व आय.एफ.एस. कोड : ________________________________________

ठिकाण :

दिनांक :

विद्यार्थ्याची सही

वडील/आईची/पालकांची सही किंवा अंगठा

(टीप : अर्जासोबत मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची व उत्पन्नाच्या दाखल्याची साक्षांकित प्रत आणि २० रूपयांच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र इत्यादि कागदपत्रे सोबत जोडावीत. अर्ज संपूर्ण कागदपत्रांसह दिनांक ३०, सप्टेंबर, २०११ पर्यंत विद्यापीठाकडे पोहोच होणे आवश्यक आहे. अपूर्ण व मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. )

## <u>विभागप्रमुख/संचालक/प्राचार्य यांनी भरावयाची माहिती</u>

अर्जदाराने वरील अर्जात दिलेली सर्व माहिती , त्यांच्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न, तो सध्या शिक्षण घेत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती, शैक्षणिक माहिती, हमीपत्रातील माहिती, मागील परिक्षेच्या गुणपत्रिका इत्यादि पूर्णपणे तपासलेली असून ती बरोबर आहे. त्यामुळे मी विभागप्रमुख/संचालक/प्राचार्य या नात्याने श्री. ______________________________________ या विद्यार्थ्यास आर्थिक मदत मिळण्याबाबत शिफारस करीत आहे.

विभागप्रमुख/संचालक/प्राचार्य यांची सही व महाविद्यालय/संस्थेचा शिक्का

# हमीपत्र

मी ______________________________________________असे लिहून देतो/ देते की, शैक्षणिक वर्ष २०११ – २०१२ करिता आर्थिक-दुर्बल घटकांतील गुणवत्ताधारक व बुध्दीमान विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अर्थसहाय्यासठी अर्ज करित आहे.

१. या शैक्षणिक वर्षात मला इतर कोणतीही स्कॉलरशिप/फ्रीशीप/आर्थिक सवलत/ आर्थिक मदत मिळालेली नाही व त्यासाठी मी अर्जही केलेला नाही.

२. आर्थिक वर्ष २०११–२०१२ मध्ये माझ्या कुटुंबातील सर्व सदस्यांचे एकत्रित उत्पन्न रू (अक्षरी रू. ) एवढेच आहे. (सोबत दाखला)

३. मागील शैक्षणिक वर्षात (२०१०–२०११) अंतिम परीक्षेत मला एकूण टक्के गुण मिळालेले आहेत. (सोबत मार्कलिस्ट)

४. कायद्यानुसार कोणत्याही अधिकार मंडळाने आजपर्यंत माझ्यावर गैरशिस्त अथवा नैतिकतेबाबत ठपका ठेवलेला नाही.

वर नमूद केलेली संपूर्ण माहिती ही केवळ सत्य आहे. सदर माहिती असत्य आहे, असे आढळून आल्यास मला मिळणारे अर्थसहाय्य रद्द होईल व माझ्यावर नियमानुसार कार्यवाही होईल, याची मला संपूर्ण जाणीव आहे. या अनुशंगाने होणाऱ्या परिणामास सर्वस्वी मीच जबाबदार असेन, अशी मी हमी देत आहे.

विद्यार्थ्याची सही
(नाव : )
वरील सर्व माहिती तपासलेली असून ती बरोबर आहे.

प्राचार्यांची सही व शिक्का

महाविद्यालयाचे नाव : ______________________

## पदवी, पदव्युत्तर, व्यावसायिक, अव्यावसायिक अभ्यासक्रम

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | मागील उत्तीर्ण झालेली परिक्षा व गुणांची टक्केवारी | सध्या शिकत असलेला अभ्यासक्रम | एकूण उपस्थिती टककेवारी | उत्पन्न | तहसिलदाराचे सहीचा उत्पन्नाचा दाखला जोडला आहे/नाही | बॅंकेचे नाव व पत्ता | बॅंकेचा खाते क्रमांक, एम. आय.सी.आर कोड, आय. एफ.एस. कोड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

प्राचार्यांची सही व शिक्का